सैनिक कल्याण विभाग,महाराष्ट्र राज्य,पुणे

दिनांक २५ नोव्हेंबर २०२६ रोजी प्रसिध्द करण्यात आलेल्या लिपिक टंकलेखक (गट-क) पदभरतीच्या निकालासंदर्भात वापरण्यात आलेले ABBREVIATIONS

Sr. No.	Abbreviations	Full Form
१.	Priority -1	शासन निर्णय दिनांक ०२ सप्टेंबर १९८३ मधील अ.क्र.१ नुसार पात्र उमेदवार
२.	Priority -2	शासन निर्णय दिनांक ०२ सप्टेंबर १९८३ मधील अ.क्र.२ नुसार पात्र उमेदवार
३.	Priority -3	शासन निर्णय दिनांक ०२ सप्टेंबर १९८३ मधील वरील प्राधान्यक्रम मध्ये न मोडणारे इतर माजी सैनिक उमेदवार
४.	SP	Sports person (खेळाडू)
५.	PA	Project Affected (प्रकल्पग्रस्त)
६.	PT	Part Time (अंशकालिन पदवीधर)
७.	LDS	Ladies (महिला)
८.	Divyang	दिव्यांग उमेदवार
९.	GEN	General (सामान्य)
१०.	WL	waiting list (प्रतिक्षा यादी)

युद्धात/सैन्यदलातील सेवेत मृत्यु पावलेल्या
किंवा अपंग झालेल्या सैनिकांच्या कुटूंबियास
शासकीय सेवेत भरती करिता पसंतीक्रम
देण्याबाबत.

महाराष्ट्र शासन,
सामान्य प्रशासन विभाग,
शासन निर्णय क्रमांक -आरटीए-१०८२-३५०२-सीआर-१००-१६अ,
मंत्रालय मुंबई - ४०० ०३२,
दिनांक :- २ सप्टेंबर, १९८३.

वाचा :- १) शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग क्रमांक एमसीएन-१०७५-९०३-१६, दिनांक १०/११/१९७६.
२)शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग क्रमांकआरटीए-१०७९/०/४८२/१६/अ, दिनांक ३ जुलै १९८०.
३)शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग क्रमांक आयपीई/आरटीए-१०८०-०-१८१-१६अ, दिनांक १० ऑक्टोबर १९८०.

शासन निर्णय

शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्रमांक आरटीए-१०७९/०/४८२/१६/अ, दिनांक ३ जुलै १९८० अन्वये माजी सैनिकांकरिता शासकीय सेवेतील वर्ग ३ व वर्ग ४ मध्ये असलेले १५ टक्के पदांचे आरक्षण कायम स्वरूपात करण्यात आलेले आहे. शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्रमांक एमसीएन- १०७५/९०३/१६, दिनांक १० नोव्हेंबर १९७६ अन्वये युद्धात किंवा सैन्य दलातील सेवेत असताना मृत्यू पावलेल्या सैनिकांच्या कुटुंबातील एका व्यक्तीस शासकीय सेवेत वर्ग ३ व वर्ग ४ मध्ये भरती करिता अग्रक्रम (Priority)देण्यात आला आहे. फेरविचार करून याबाबत आता शासन असे आदेश देत आहे की :-

(१)माजी सैनिकांसाठी वर्ग ३ व वर्ग ४ मधील आरक्षित असलेल्या १५ टक्के पदांवर भरती करताना युद्ध काळात किंवा युद्ध नसताना सैन्यातील सेवेमुळे अपंग झालेल्या माजी सैनिकांना १५ टक्के राखीव पदांपैकी उपलब्ध पदांवर प्राधान्य क्रमाने नियुक्त करावे.

(२)युद्ध काळात किंवा युद्ध नसताना सैनिकी सेवेत मृत झालेल्या किंवा अपंगत्व येऊन त्यामुळे नोकरीसाठी अयोग्य झालेल्या माजी सैनिकांच्या कुटुंबातील फक्त एका व्यक्तीला त्या नंतरच्या पसंती क्रमाने वर्ग ३ व वर्ग ४ मधील १५ टक्के आरक्षित पदांपैकी उपलब्ध पदांवर नियुक्त करावे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

प्र.द.माळवे,
अप्पर सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रति,

राज्यपाल यांचे सचिव,
मुख्यमंत्री यांचे सचिव,
उपमुख्यमंत्री यांचे सचिव,
सर्व मंत्री/ राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव/स्वीय सहाय्यक,
प्रबंधक, मूळ न्याय शाखा, उच्च न्यायालय, मुंबई,
प्रबंधक, अपील शाखा, उच्च न्यायालय, मुंबई,
सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई.
महालेखापाल, महाराष्ट्र १, मुंबई,
महालेखापाल, महाराष्ट्र २, नागपूर,
अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.

कारगिल प्रिंटर्स, सातारा/२७७७९.